राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपीले

राज्य माहिती आयुक्त कार्यालय, पुणे
विभाग, पुणे नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिलहॉल समोर,
पुणे ४११ ००१. दुरध्वनी- २६१११२३९

## शुध्दिपत्र

डॉ. ज्ञानचंद्र श्रीधर पाटील,
शितल दमाणी हायस्कूलच्या पुर्वेस,
चांदणी चौक, शिवाजीनगर, सांगली — अपीलकर्ता

विरुध्द

१. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी,
(माध्यमिक) जिल्हा परिषद, सांगली

अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी
अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक — उत्तरवादी
सांगली हायस्कूल, सांगली

जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी,
(माध्यमिक) जिल्हा परिषद, सांगली

जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक
कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

डॉ. ज्ञानचंद्र श्रीधर पाटील यांनी दाखल केलेल्या पंधरा द्वितीय अपिलांची सुनावणी दि. १७.४.२००७ रोजी घेण्यात येऊन या अपिलांवर एकत्रितात निर्णय दि. १९.५.२००७ रोजी देण्यात आला.

दि. १९.५.२००७ रोजी प्रस्तुत अपिलांमध्ये पारित केलेल्या आदेशामध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे :

## आदेश

दि. १९.५.२००७ च्या निर्णयातील पृष्ठ क्र.२१ वरील अ.क्र.४ येथे " अपील क्र.११४ मध्ये माहिती देण्यास झालेल्या ७ दिवसांच्या विलंबाबद्दल रु. १७५०/- शास्ती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांना लावण्यात येत आहे " असे नमूद असून त्या ऐवजी " अपील क्र.११४ मध्ये माहिती देण्यास झालेल्या ७ दिवसांच्या विलंबा बद्दल रु. १७५०/- शास्ती जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सांगली यांना लावण्यात येत आहे, " असे वाचावे. जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन शिक्षणाधिकारी(माध्यमिक)यांचेकडून जून २००७ च्या जुलै २००७ मधील अनुज्ञेय वेतनातून सदरची शास्तीची रक्कम वसुल करुन भरणा करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांची आहे, त्यांनी या बाबतचा पूर्तता अहवाल दि. २०.७.२००७ पर्यंत सादर करावा.

दि. १९.५.२००७ रोजी या अपिलांमध्ये पारीत करण्यात आलेल्या आदेशामध्ये अन्य दुरुस्ती / फेरबदल नाहीत.

दि. १६ /६/२००७

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

(8)



राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. संपत पांडुरंग आबदार
३८१, अवधूत जयभवानी कॉलनी,
फुलेवाडी, कोल्हापूर-४१६ ०१० — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,कोल्हापूर
श्री.आर. आर. केडगे — अपील क्र.७,८,९,१०

जन माहिती अधिकारी तथा
प्रभारी सहा. अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर
श्री. आ.ज. यादव — उत्तरवादी

| अपील क्र. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| ७ /कोल्हापूर | दि. ५.१२.२००५ | दि. ६.१.२००६ | दि. १२.१.२००६ | दि. १६.३.२००६ |
| **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** | सी.पी.आर. रुग्णालयाच्या आवारातील चार शस्त्रक्रियागृहाच्या भिंतीना Macarana Millty White "Marble Fixing" बसविणेच्या बाबीचा दर अंदाजपत्रकामध्ये छापील दरसूची प्रमाणे रु.८२०/- चौ.मी. व जादा दराच्या निविदा स्वीकारण्यासाठी चालू दरामध्ये बसविणेसाठी हस्तलिखीत पुरवणी दरसूचीमधील याच बाबीचा दर रु. १७४८/- चौ.मी. अंतर्भूत करुन दरसूचीच्या माध्यमातून एकाच बाबीमधून केलेल्या भ्रष्टाचाराबाबत सदर बाब निदर्शनास आणून दिलेली असताना काय कारवाई झाली आहे याबाबत अद्याप कळलेले नाही ते कळविणेबाबत. तसेच शस्त्रक्रिया गृहासाठी भारतातील अतिउत्तम "Macarana Millty White" संगमरवरामध्ये उभारलेल्या वास्तूतील संगमरवर १० वर्षामध्ये कसा खराब झाला व तो संगमरवर काढून ceramic बसविणेचे प्रयोजन काय व काढलेल्या संगमरवराचे काय केले याची माहिती | | | |

| अपील क्र. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय अधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| ८/कोल्हापूर | दि.२.१२.२००६ | दि. ३.३.२००६ | दि. १३.१.२००६ | दि. २.५.२००६ |
| मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | कार्यकारी अभियंता, म.रा.र.वि.महामंडळ मयादित याचे पत्र क्र. मरारविमं (मर्या) ३५२२ दि. १०.१०.२००० च्या पत्रास पाठविलेल्या अहवालाची प्रत. उपरोक्त विषयाबाबत दैनिक टाईम्स ऑफ इंडिया दि. ७.३.२००१ रोजी आलेल्या बातमीमध्ये अधीक्षक अभियंता व संबंधित ठेकेदार यांनी केलेल्या खुलाशाप्रमाणे खात्यामार्फत केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची प्रत. खात्यामार्फत व ठेकेदारांमार्फत संयुक्तपणे पुलाच्या बांधकामाच्या खर्चाचे अंदाजपत्रक रेल्वे खात्यास सादर केले आहे, त्याची एकूण रक्कम व सदर अंदाजपत्रकाप्रमाणे रेल्वे खात्यास ८.२५ टक्के प्रमाणे भरणेत आलेल्या रकमेचा तपशील | | | |

| अपील क्र. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय अधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| ९/ कोल्हा-पूर | दि. ५.१२.०६ | दि. ६.१.०६ | दि. १३.१.०६ | दि. २.५.०६ |
| मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | किरकोळ दुरुस्ती कार्यक्रमातून रस्त्यांची व इमारतींची कामे निविदा मागवून ठेकेदारांमार्फत करणेत आलेली दाखविली जातात, प्रत्यक्षात खात्याचे मजूर, रोलर, ट्रक, टिप्पर,बॉयलर वापरुन केली जातात, सदरची वसुली ठेकेदारांच्या देयकामधून केली जाते काय. खात्याकडे उपलब्ध असणा-या मजूरांकडून नेमकी कोणती कामे केली जातात. | | | |

| अपील क्र. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय अधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| १०/कोल्हा-पूर | दि. १२.१२.२००५ | दि. ४.१.२००६ | दि. २४.१.२००६ | दि.३१.३.२००६ |
| मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | दि. १३.०६.२००५ रोजी हुडको-४ अंतर्गत पूर्ण झालेली/प्रगतीत असलेली सार्वजनिक बांधकाम विभाग कोल्हापूर अंतर्गत करवीर तालुक्यातील कामांची माहिती. दि. १३.६.२००५ रोजी दक्षता व गुणनियंत्रण मंडळाचे कार्यकारी अभियंता यांनी कामावर भेट दिली त्यावेळी डांबरी करणाचे काम चालू होते याबाबत संबंधिताकडून काय कारवाई झालेली आहे | | | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.संपत पांडुरंग आबदार यांनी सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर यांच्यातर्फे झालेल्या/चाललेल्या विविध कामांच्या संदर्भात जन माहिती अधिका-यांकडे मागितलेली माहिती मिळाली नाही किंवा अपुरी मिळाली, आणि प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दिलेल्या निर्णयाने समाधान झाले नाही /आदेश देऊनही माहिती मिळाली नाही, या कारणांवरुन राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या चार अपिलांची एकत्रित सुनावणी दि. १४.५.२००७ रोजी घेतली. सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर यांचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपीलकर्ता श्री.आबदार मात्र उपस्थित नव्हते. पुणे येथे माहिती आयोगाच्या कार्यालयात सुनावणीसाठी हजर रहाणे आपल्याला असुरक्षित असल्याने सुनावणीसाठी आपण हजर राहू शकत नाही. आपल्या जीविताला धोका असल्यामुळे आपण जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे सरंक्षणाची मागणी केली आहे. ते आपल्याला अद्याप मिळालेले नाही, म्हणून आपण येऊ शकत नाही, असे त्यांनी कळविले होते. त्यांना लेखी निवेदन पाठविण्याची सूचना दिल्यानुसार त्यांनी लेखी निवेदन पाठविले.

(७अ) सी.पी.आर. रुग्णालयाच्या आवारात चार शस्त्रक्रियागृहांच्या इमारतीचे बांधकाम (८) पेठ, सांगली, मिरज, म्हैसाळ रस्त्यावर खाजगी करणातून रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकाम (९) रस्ते किरकोळ दुरुस्ती कार्यक्रम २००५.०६ (१०) हुडको-चार अंतर्गत रस्त्यांच्या कामाची दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, पुणे यांनी दि.१३.६.२००५ रोजी केलेली पाहणी व तेव्हा चालू असलेले डांबरीकरण ..

हे अपिलांचे विषय आहेत. या सर्व कामांमध्ये आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचार झाल्याचा श्री. आबदार यांचा आरोप आहे. त्याबाबतची माहिती त्यांनी सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती.

'दक्षता व गुणनियंत्रण मंडळाचे अधिकारी काम पाहणेस येतात म्हणजे नेमके काय पाहायला येतात याचे गेल्या वीस वर्षामध्ये मला आकलन झाले नाही. प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, मंजूर निविदांमधील तरतुदी व प्रत्यक्ष केलेले काम, त्याचे परिमाण व गुणवत्ता उत्तम प्रतीची मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रे प्रत्यक्ष कामाच्या साईटवर असणे सक्तीचे असताना व त्याचवेळी संबंधितांनी ते सर्व पहाणे सक्तीचे असताना सदर कागदपत्रे नंतर विश्रामगृहामध्ये किंवा इतर ठिकाणी

दाखविणेबाबतचा आग्रह करणेचे नेमके कारण काय आहे?' अशा स्वरुपाची शेरेवजा विचारणा त्यांच्या अर्जामध्ये आहे. तसेच 'सरकारी नोकरीमध्ये अधिकारी पदावर काम करणा-या व्यक्तीच्या बौध्दिक दारिद्रयाचा अभ्यास करणेसाठी, स्वकियांचे, आप्तेष्टांचे किंवा सहकारी यांचे धार्मिक कार्यासाठीसुध्दा स्वतःचा वेळ, पगारातील पैसा खर्च करावयाची दानत नाही. सदर कार्यही सरकारी वेळेत, सरकारी पैशाने करण्याची प्रवृत्तीवर प्रकाश टाकणेसाठी' आपल्याला ही माहिती हवी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मागण्याचा उद्देश नमूद करण्याचे बंधन नाही, तरीही त्यांनी हा उद्देश नमूद केला आहे.

(७अ) - सी.पी.आर. रुग्णालयाच्या आवारातील शस्त्रक्रियागृहांच्या इमारतीसाठी भिंतीना संगमरवरी फरशी बसवण्याचा दर रु.१७४८/- प्रति चौ.मीटर अंतर्भूत करुन भ्रष्टाचार केला गेला. संगमरवरी फरशी काढून सिरॅमिक फरशी बसविली त्याचे कारण काय ? या विचारणेबाबत दरसूचीनुसार स्पष्टीकरण दिले गेलेले आहे. तसेच संगमरवरी फरशी काढून सिरॅमिक फरशी बसविलेलीच नाही, हेही जन माहिती अधिकारी तथा प्रभारी सहा. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ कोल्हापूर यांनी स्पष्ट केले आहे.

(८) - रेल्वे उडड्ाण पूल बांधकामाबाबत बांधकाम मंडळाकडे असणारी माहिती मंडळाने दिली. मुद्दा क्र. २ व ३ बाबतची माहिती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांच्याकडून घ्यावयाची असल्यामुळे दिलेली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा प्रभारी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर व अपिलीय प्राधिका-यांनी सांगितले.

(९) - रस्ते किरकोळ दुरुस्ती कार्यक्रमातील माहिती देण्यात आली आहे. 'रस्तेनिहाय मजूरांची संख्या पडताळून जो असमतोल आहे तो दूर करावा व पुरवणी अर्ज (अपिलासोबत दिलेला) त्यामध्ये मागणी केलेली माहिती लवकरांत लवकर संकलित करुन द्यावी,' असे अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांनी निर्णयपत्रात म्हटले आहे. मूळ अर्जात नसलेली अतिरिक्त माहिती श्री. आबदार यांनी अपिलामध्ये मागितली आहे. ती संकलित करुन अद्याप आपल्याला मिळालेली नाही, हे त्यांच्या द्वितीय अपिलाचे कारण आहे.

(१०) - हुडको-४ अंतर्गत पूर्ण झालेल्या/ प्रगतीत असलेल्या रत्यांबाबत दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, पुणे यांच्या निरीक्षण ज्ञापनाची प्रत श्री. आबदार देण्यात आली आहे. त्यातील माहिती चुकीची, खोटी व विसंगत आहे, असा आक्षेप घेऊन श्री. आबदार यांनी तीन कामांची मोजमाप पुस्तके व डांबर पुरविण्याच्या चलनांच्या फोटोप्रती मिळण्याची मागणी राज्य माहिती आयोगापुढील अपिलातील निवेदनात केली आहे. परंतु आक्षेपाला पुष्टी देणारी माहिती त्यांनी सादर केलेली नाही.

मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त मागणी श्री. आबदार प्रत्येक पातळीवर करत आहेत, असे चारही अपिलांमध्ये दिसून येते.

श्री. आबदार सातत्याने अशा स्वरुपाचे अर्ज करीत असतात. भ्रष्टाचार झाल्याचे अनुमान काढून माहिती मागतात, तरीही त्यांना योग्य ती माहिती पुरविण्याचा व अपिलाच्या सुनावणीत त्यांच्या मुद्यांबाबत विस्ताराने चर्चा करुन शंकांचे निरसन करण्याचा प्रयत्न केला जातो, असे जन माहिती तथा प्रभारी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर यांनी सुनावणीत सांगितले. त्याच्या पुष्टयर्थ त्यांनी कागदपत्रेही सादर केली. प्रथम अपिलाच्या निर्णयपत्रांमधूनही अशा चर्चेची प्रक्रिया दिसून येते.

श्री. आबदार हे सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कोल्हापूर येथे सहायक अभियंता वर्ग-२ या पदावर काम करतात. अनेक कामांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे व अन्य अधिका-यांनी शासकीय पैशाचा अपहार केल्याचे आरोप करणारा पत्रव्यवहार ते विविध पातळयांवर करीत असतात. यामुळे आपल्या जीविताला धोका असल्याची तक्रार करणारे अर्ज श्री. आबदार यांनी जिल्हाधिकारी कोल्हापूर, पोलिस अधीक्षक सांगली यांच्याकडे इ.स. २००० ते २००६ या काळात केले आहेत. या अर्जावर अद्याप कार्यवाही झालेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. कोल्हापूरमध्ये प्रथम अपिलाच्या सुनावणीला ते उपस्थित असतात, असे कागदपत्रावरुन दिसते. जीविताला धोका असल्याबाबत, तसेच कामांमध्ये भ्रष्टाचार झाल्याबाबत कोणतीही ठोस माहिती त्यांनी स्वत: सादर केलेली नाही. भ्रष्टाचार झाला आहे, असे गृहीत धरुन तो सिध्द करणारी माहिती ते संबंधित यंत्रणेकडेच मागत आहेत व मिळालेली माहिती खोटी/विसंगत/अपुरी असल्याचे कारण नमूद करुन राज्य माहिती आयोगाकडे अपील करीत आहेत, असे या चारही अपिलांमधून दिसून येते.

वरील बाबी लक्षात घेऊन मी खालील प्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील अमान्य.

२. अपील क.८ मध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांच्याकडून निविदांबाबतची माहिती मिळवून देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले आहे, ती दि. १५.६.२००७ पर्यंत अपीलकर्त्याला द्यावी.

पुणे

दि. ११ /६/२००७

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग पुणे

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिलहॉल समोर,
पुणे ४११ ००१

श्री. शिवाजी जगन्नाथ वाडेकर
ओंकार ३१, अंजली कॉलनी, गेंडामाळ,
शाहूपुरी, सातारा

अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
उपसचिव, महाराष्ट्र शासन,
पशुसवंर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२
श्री. स.या.ठाकरे

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
अवर सचिव,
पशुसवंर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०/ सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | १५.५.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ३ | उपस्थित | **अपीलकर्ता**<br>श्री. शिवाजी जगन्नाथ वाडेकर<br>ओंकार ३१, अंजली कॉलनी, गेंडामाळ, शाहूपुरी, सातारा<br>**अपिलीय प्राधिकारी तथा**<br>उपसचिव, महाराष्ट्र शासन, पशुसवंर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय विभाग,<br>मंत्रालय, मुंबई-३२<br>श्री. स.या.ठाकरे |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१८.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | १६.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | शासनाचा कोणताही आदेश नसताना शासकीय दुग्धशाळा सातारा ही दि. १.५.२००५ पासून पूर्णत: बंद करण्याची कार्यवाही या योजनेचे दुग्धशाळा व्यवस्थापक, प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, पुणे व तत्कालीन आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग, मुंबई यांनी त्यांचे वैयक्तिक स्तरावरुन का केलेली आहे याची माहिती, शासकीय आदेश असल्यास त्याची प्रत |

## विवेचन

शासनाचा कोणताही आदेश नसताना शासकीय दुग्धशाळा, सातारा ही दि. १-५-२००५ पासून पूर्णतः का बंद केली याबाबतची माहिती अपिलार्थी श्री. शिवाजी जगन्नाथ वाडेकर यांनी मागविली होती. परंतु जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, पशुसवंर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांनी कोणतेही उत्तर दिले नाही. तीस दिवस वाट पाहून श्री.

वाडेकर यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव, पशुसवंर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे अपील केले. परंतु त्यांनीही अपिलाची दखल घेतली नाही. म्हणून श्री. वाडेकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या वतीने श्री. स.या. ठाकरे, उप सचिव, पशुसवंर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई हे उपस्थित होते.

साता-याची दुग्ध शाळा दुग्ध विकास विभागाच्या अधिका-यांनी मनमानी कारभार करुन दिनांक १-५-२००५ पासून बंद केली. शासनाच्या कोणत्या आदेशान्वये व कोणत्या कारणांमुळे अधिका-यांनी ही शाळा बंद केली, याची माहिती संबधित आदेशाच्या व कारणांच्या प्रतीसह मिळावी अशी मागणी श्री. वाडेकर यांनी केली होती. कोणताही अधिकार नसताना दुग्ध शाळा व्यवस्थापक , प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, पुणे व तत्कालीन आयुक्त, दुग्ध विकास विभाग, मुंबई यांनी दुग्ध शाळा बंद केल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

दुग्ध शाळा अधिका-यांनी बंद केलेली नाही, तर दूध पुरवठा होत नसल्यामुळे दूध-वितरणाचे कार्यच राहिले नाही, म्हणून बंद पडली आहे, असे स्पष्टीकरण उप सचिव श्री. ठाकरे यांनी सुनावणीत केले. जिल्हा सहकारी दूध संघांना दूध पुरवठयाबाबत शासनाने स्वतंत्र आदेश काढला आहे. परंतु दुग्ध शाळा बंद करण्याबाबत कोणताही आदेश काढलेला नाही. मात्र दूध पुरवठा थांबल्यामुळे दुग्ध शाळांचे कामकाज आपोआप बंद पडले आहे. यात अधिका-यांनी मनमानी करण्याचा प्रश्नच येत नाही. तसेच अशी परिस्थिती असल्यामुळे शासकीय आदेश अथवा कारणे यांच्या प्रती देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही, असे श्री. ठाकरे यांनी सांगितले.

कार्यालयातील अतिरिक्त कार्यभार व संबधित कर्मचा-यांवरील कामाचा बोजा यामुळे माहिती दिली गेली नाही. तसेच प्रथम अपिलाची सुनावणी झालेली नाही. ती त्वरित करुन श्री. वाडेकर यांना योग्य ती माहिती दिली जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

श्री. वाडेकर हे महाराष्ट्र शासन दुग्ध तंत्रज्ञ/ संघटनेचे सरचिटणीस आहेत. केवळ साता-याच्याच दुग्ध शाळेबाबतची अशी परिस्थिती नाही, तर संपूर्ण राज्यात हा प्रश्न आहे. त्यामुळे दुग्ध व्यवसाय विभागातील सुमारे साडेतेरा हजार कर्मचारी सध्या कामाअभावी आहेत, या कर्मचा-यांवरील वेतन आदि खर्च चालू आहे. तसेच शासकीय दुग्ध शाळेची यंत्र सामग्रीही बंद अवस्थेत

आहे, अशी माहितीही सुनावणीच्या वेळी उभय बाजूंकडून देण्यात आली. कर्मचा-यांना सध्या काम नाही. परंतु ते काम करु इच्छितात, असे श्री. वाडेकर यांनी स्पष्ट केले. मात्र काम नसल्यामुळे वरील कर्मचारी, संख्या व यंत्र सामग्री यामुळे शासनाच्या / म्हणजेच पर्यायाने जनतेच्या तिजोरीवर पडत असलेला बोजा ही गंभीर बाब आहे. त्याकडे दुग्ध व्यवसाय खात्याचे सचिव व महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

वरील पार्श्वभूमिवर आयोगाचा आदेश पुढील प्रमाणे :

## आदेश

१) अपील मान्य.

२) बदलते कर्मचारी , अतिरिक्त कार्यभार [redacted] आणि दूध पुरवठयाबाबतची संदिग्ध स्थिती ही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी श्री. ठाकरे यांनी नमूद केलेली परिस्थिती मान्य करण्यात येत आहे. त्यामुळे शास्ती लावण्यात आलेली नाही.

३) प्रथम अपिलाची सुनावणी नियोजित मुदतीत होणे आवश्यक आहे, याची समज अपिलीय प्राधिकारी यांना देण्यात येत आहे.

४) अपीलीय प्राधिकारी यांनी दिनांक २०-६-२००७ पर्यंत श्री. वाडेकर यांच्या अर्जाची सुनावणी करुन निर्णय द्यावा. त्या निर्णयाने समाधान न झाल्यास श्री. वाडेकर यांना राज्य माहिती आयोगाकडे साध्या अर्जाद्वारे दाद मागता येईल.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. १२.६.२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौन्सिलहॉल समोर,
पुणे ४११ ००१

श्री. दत्तात्रय कुंडलिकराव फरांदे
रा. ओंकार, सुदर्शननगर, चिचंवड, अपीलकर्ता
पुणे-४११ ०३३

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
पुणे विभाग, पुणे
श्री. अे.एच. शिंगणे उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
कारभारी, चिंचवड देवस्थान ट्रस्ट,
चिंचवड, पुणे-३३
श्री. विठ्ठल महादेव पवार

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.६.२००७ |
| ३ | उपस्थित | अपीलकर्ता<br>श्री. दत्तात्रय कुंडलिकराव फरांदे<br>रा. ओंकार, सुदर्शननगर, चिचंवड<br>पुणे-४११ ०३३ |

| | | |
|---|---|---|
| | | अपिलीय प्राधिकारी तथा<br>सहाय्यक धर्मादाय आयुक्त,<br>पुणे विभाग, पुणे<br>श्री. अे.एच. शिंगणे<br><br>जन माहिती अधिकारी तथा<br>कारभारी, चिंचवड देवस्थान ट्रस्ट,<br>चिंचवड, पुणे-३३<br>श्री. विठ्ठल महादेव पवार |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.३.२००६ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | मंगलमूर्ती वाडा बांधकामासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मंजूर केलेला नकाशा, टेंडर, ठेकेदाराला दिलेले पत्र, बांधकामाचा दर इत्यादी कागदपत्रे |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दत्तात्रय कुंडलिकराव फरांदे, विश्वस्त, चिंचवड देवस्थान ट्रस्ट,पुणे-३९ यांनी मागितलेली माहिती चिंचवड देवस्थान ट्रस्टने मुदतीत दिली नाही, म्हणून त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे दि. १७.२.००६ रोजी अपील केले होते. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग, पुणे श्री. अे.एच. शिंगणे यांनी अपिलाची सुनावणी करुन दि. ६.३.२००६ रोजी दिलेल्या आदेशानुसार माहिती देण्यासाठी दोन महिन्यांची मुदत मुख्य विश्वस्तांना दिली. परंतु याप्रमाणे माहिती मिळाली

नाही, म्हणून दि. १६.५.२००६ रोजी श्री. फरांदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग, पुणे श्री. शिंगणे यांच्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, याची दाखल त्यांनी घेणे आवश्यक होते, ती त्यांनी घेतलेली नाही, असे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसते. परिणामी अमलात न येणारा आदेश केवळ कागदोपत्री उरतो.

दरम्यान आपल्याला हवी असलेली माहिती आता मिळाली आहे. या संदर्भात आपला गैरसमज व मतभेद दूर झाले असून आपण अपील बिनशर्त मागे घेत आहोत, असे निवेदन श्री. फरांदे यांनी दि. १२.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाला सादर केले आहे. चिंचवड देवस्थान ट्रस्टचे कारभारी श्री. पवार यांनी दि. १३.६.२००७ रोजी समक्ष उपस्थित राहून माहिती दिल्याबाबतचा तपशील सादर केला.

आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपीलकर्त्याला माहिती मिळाली असल्यामुळे त्यांच्या विनंतीनुसार अपील मागे घेण्यास अनुमती देऊन अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दिनांक :- १९/६/२००७

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

## राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे -१

श्री एम.एम.डफेदार
सुपे ता.बारामती जि.पुणे.

अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
जिल्हाधिकारी, पुणे
श्री. प्रभाकर देशमुख

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा ,
विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.३
नवीन प्रशासकीय भवन,डी विंग, पुणे १
श्रीमती सुनंदा गायकवाड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८ /पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दिं. ८/५/२००७ |
| ३ | उपस्थित | **अपीलकर्ता**<br>श्री एम.एम.डफेदार<br>सुपे ता.बारामती जि.पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा<br>जिल्हाधिकारी, पुणे<br>श्री. प्रभाकर देशमुख<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा<br>विशेष भूमी संपादन अधिकारी क्रं.३<br>नवीन प्रशासकीय भवन,डी विंग, पुणे १<br>श्रीमती सुनंदा गायकवाड |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.१२.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.५.२००६ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | १. मोजे दंडवाडी, तालुका बारामती येथील जमीन गट क्रमांक ७७२या संपादित जमिनीच्या भरपाईची रक्कम न मिळाल्याची कारणे.<br>२. संबंधित कागदपत्रे कोणत्या न्यायालयात पाठविली त्याचा तपशील. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. एम.एम.डफेदार, विश्वस्त,शाह मन्सुरअली दर्गा, सुपे यांनी मौजे दंडवाडी, तालुका बारामती येथील जमीन गट क्रमांक ७७२ या जमिनीच्या भरपाईच्या संदर्भात विशेष भूमी संपादन अधिकारी यांचेकडे माहिती मागितली होती.ही जमीन देवस्थानची असुन तिच्या भरपाईच्या वाटपाची तारीख ९/५/१९९८ होती. त्या दिवशी विश्वस्तांना रक्कम मिळालेली नाही. ती न मिळण्याच्या कारणांमधील काही मुद्यांची माहिती विशेष भूमी संपादन अधिकारी यांनी दिली, परंतु या जमिनीबाबतचे प्रकरण दिनांक ३/०/७/१९९९ रोजी जिल्हा दिवाणी न्यायालयात पाठविणेत आले असलेचे त्यांनी कळविले होते. हे प्रकरण कोणत्या न्यायालयात (न्यायधीशांपुढे) पाठविणेत आले आहे त्यांचे नाव, दाव्याचा क्रमांक आणि न्यायालयात पाठविलेल्या कागदपत्राच्या प्रती मिळाव्यात ही मागणी पूर्ण झाली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी यांनी संबंधित सर्व कागदपत्रे श्री. डफेदार यांना तपासणीसाठी द्यावी, त्यांना हव्या असलेल्या प्रती त्याच दिवशी अगर दुस-या दिवशी द्याव्यांत, असे आदेश ९/३/२००६ रोजी दिले. परंतु ही माहिती अद्यापही न मिळाल्याने श्री. डफेदार यांनी ९/५/२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. कागदपत्रे मिळाली नाहीत, एवढेच नव्हे, तर न्यायालयीन तपशील देणेबाबत अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे आदेश असूनही विशेष भूमी संपादन अधिका-याकडुन गेल्या आठ वर्षात सहकार्य मिळालेले नाही , असे त्यांनी अपीलात नमूद कले आहे. राज्य माहिती आयोगा पुढील सुनावणीतही त्यांनी त्याचा पुनरुच्चार केला. न्यायालयातील दाव्याबाबतचा तपशील आपल्याला मिळावा. शास्ती वा अन्य कारवाईची आपली मागणी नाही ,असे

श्री. डफेदार यांनी स्पष्ट केले आहे. ही माहिती सुनावणीच्या तारखेपासून एक आठवडयात दिली जाईल अशी हमी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी श्री. प्रभाकर देशमुख यांनी दिली.

न्यायालयात दाखल केलेल्या दाव्याबाबतची माहिती विशेष भूमी संपादन अधिकारी यांनी आठ वर्षात दिली नाही, याबाबत माहितीच्या अधिकार कायाद्याखाली अर्ज केल्यापासून दीड वर्ष उलटल्यानंतरही ही माहिती दिली जात नाही हे अत्यंत आक्षेपार्ह आहे. अपिलीय प्राधिकारी यांनी आदेश दिल्यानंतरही वर्ष उलटून गेले तरी माहिती दिली जात नाही, हेही माहितीच्या अधिकार कायद्यातील अटींशी व जबाबदारीशी सुसंगत नाही. माहिती देण्याविषयीच्या आदेशांच्या पूर्ततेबाबत अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी श्री. प्रभाकर देशमुख यांनी अधिक काटेकोरपणे दखल घेणे आवश्यक आहे.

वरील बाबी विचारात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील मान्य.

२. अपीलकर्ता श्री. एम.एम.डफेदार यांना न्यायालयीन दाव्यासंबंधी हवा असलेला तपशील विशेष भूमी संपादन अधिका-यांनी दिनांक २१/६/००७ पर्यंत द्यावा.

पुणे
दिनांक : १९ /६/२००७.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग पुणे.

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. गोविंद आनंदा जगताप
साईकृपा, सुरज हॉटेल समोर,
बागवान मळा, शिरुर घोडनदी,
ता. शिरुर, जि. पुणे- ४१२ २१० — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
विभागीय कृषि सहसंचालक,
पुणे विभाग, पुणे-५
डॉ. श्री. प्र.व.फिरके — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
प्रशासन अधिकारी,
विभागीय कृषि सहसंचालक,
पुणे विभाग, पुणे-५
श्री. एस.बी.परदेशी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१ /पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १३/६/२००७ |

| | | |
|---|---|---|
| ३ | उपस्थित | **अपीलकर्ता**<br>श्री. गोविंद आनंदा जगताप<br>साईकृपा, सुरज हॉटेल समोर,<br>बागवान मळा, शिरुर घोडनदी,<br>ता. शिरुर, जि. पुणे- ४१२ २१०<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा<br>विभागीय कृषि सहसंचालक,<br>पुणे विभाग, पुणे-५<br>डॉ. श्री. प्र.व.फिरके<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा<br>प्रशासन अधिकारी,<br>विभागीय कृषि सहसंचालक,<br>पुणे विभाग, पुणे-५<br>श्री. एस.बी.परदेशी |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याच्या निर्णयाची तारीख | दि. २५.५.२००६ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | १. सेवा पुस्तकात जातीच्या दाखल्याची नोंद घेण्यासाठी सादर केलेला तहसीलदार कोपरगांव यांचेकडील दि. ६.३.१९६२ चा मूळ दाखल परत मिळावा.<br>२. सेवापुस्तकात जात-बदलाची नोंद करण्याच्या मागणीच्या कार्यवाहीबाबत कळावे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. गोविंद आनंदा जगताप हे दि. ३.१.१९६३ रोजी कृषि संचालक कार्यालयात सर्वसाधारण गटातून नियुक्त झाले. नियुक्तीच्या वेळी त्यांच्या जातीची नोंद 'भारतीय ख्रिश्चन' असा केला

प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतीची प्रत' पाठविली. मूळ दाखला अहमदनगर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविला असल्याचे सुनावणीत प्रथमच सांगण्यात आले. नियमानुसार श्री.जगताप यांचा माहितीच्या मागणीचा अर्ज त्या कार्यालयाकडे पाठविणे किंवा विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयाने अहमदनगर जिल्हाधिकारी यांचेकडून हा दाखला मागवून श्री.जगताप यांना परत करणे आवश्यक होते. मात्र याबाबत श्री.जगताप यांना काहीही कळविले गेले नाही. सेवापुस्तकात नोंद दि. २५.५.२००६ च्या आदेशान्वये करण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सांगितले. मात्र राज्य माहिती आयोगापुढील सुनावणीत हे सांगितले जाईपर्यंत त्याची माहिती आपल्याला मिळाली नव्हती, असे श्री.जगताप यांनी नमूद केले. जात बदलाची मागणी सरकारी सेवेत दाखल झाल्यापासून २३ वर्षांनी श्री.जगताप यांनी केली या मागणीसाठी एवढा प्रदीर्घ कालावधी का लागला, याचे समाधानकारक स्पष्टीकरण ते देऊ शकले नाहीत.

संबंधित कागदपत्रे व उभय बाजूंचे निवेदन लक्षात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य

२) अहमदनगर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून श्री.जगताप यांचा जात विषयक मूळ दाखला दि. २०.७.२००७ पर्यंत विभागीय कृषि सहसंचालक यांनी त्यांना उपलब्ध करुन द्यावा .

३) सेवापुस्तकात केलेल्या जात बदल नोंदीची साक्षांकित प्रत श्री.जगताप यांना विभागीय कृषि सहसंचालक यांनी त्वरित (सुनावणीच्या दिवशीच) द्यावी. (सुनावणीच्या दिवशीच याबाबतचा तोंडी आदेश देण्यात आलेला आहे.)

वरील क्रमांक २ व ३ चा पूर्तता अहवाल दि. २०.७.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दिनांक :- २० /६/२००७

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौन्सिलहॉल समोर,
पुणे ४११ ००१

श्री. प्रदीप शंकरराव भालेराव — अपीलकर्ता
५०२, गणेशपेठ, पुणे-४११००२

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे
श्री. चंद्रकांत माणिकराव सोनटक्के — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.६.२००७ |
| ३ | उपस्थित | अपीलकर्ता<br>श्री. प्रदीप शंकरराव भालेराव<br>रा. ५०२, गणेशपेठ, पुणे-४११००२<br><br>अपिलीय प्राधिकारी तथा<br>प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे<br>श्री. चंद्रकांत माणिकराव सोनटक्के |

| | | |
|---|---|---|
| | | जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे<br>श्री. विरसिंह ह. ठाकूर |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | १. खाजगी संवर्गात नोंद झालेल्या ट्रॉन्सपोर्ट ऑटो रिक्षांचे पूर्वीचे व नवे क्रमांक, मालकांची नावे व पत्ते<br>२. परिवहन कार्यालयामध्ये स्क्रॅप म्हणून नोंद असलेल्या ऑटोरिक्षांचे क्रमांक व अशा मालकांची नावे व पत्ते |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. प्रदीप शंकर भालेराव यांनी १. खाजगी संवर्गात नोंद झालेल्या ट्रान्सपो ऑटो रिक्षांचे पूर्वीचे क्रमांक व खाजगी क्रमांक २. स्क्रॅप झालेल्या ऑटो रिक्षांचे क्रमांक व य। दोन्हीच्या मालकांचे नाव, पत्ता असलेली माहिती फ्लॉपीद्वारे मागितली. पुणे शहर व जिल्हयामध्ये खाजगी झालेल्या ऑटो रिक्षांचा वापर करुन मोठया प्रमाणात व्यवसाय होत आहे, तसेच स्क्रॅप झालेल्या हजारो ऑटो रिक्षा विनापरवाना व्यवसाय करीत आहेत. अशा ऑटो रिक्षांना अपघात झाल्यास प्रवाशांना/त्यांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई मिळणार नाही, म्हणून ही माहिती आपण उघड करु इच्छितो, असे श्री. भालेराव यांनी जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन

अधिकारी, पुणे यांच्याकडे सादर केलेल्या दोन स्वतंत्र अर्जांमध्ये नमूद केले होते. जन माहिती अधिका-यांनी नियमानुसार मुदतीत उत्तर दिले, परंतू त्यात केवळ संबंधित ऑटो रिक्षांची संख्या कळविली. खाजगी संवर्गात नोंद झालेल्या ऑटो रिक्षांसाठी रु. १८,३२०/- व स्क्रॅप झालेल्या ऑटो रिक्षांच्या माहितीसाठी रु. ३७६०/-, शिवाय प्रत्येक फ्लॉपीसाठी ५०/- रुपये असे शुल्क भरण्यास सांगितले. हे शुल्क अवाजवी असल्याच्या कारणावरुन श्री. भालेराव यांनी अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांच्याकडे अपील दाखल केले. त्यांनी अपिलाची दखल घेतली नाही, म्हणून श्री. भालेराव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

श्री. भालेराव यांनी अपील दाखल केले तेव्हा उपरोक्त पदांवर अन्य अधिकारी होते. सध्या प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे श्री. चंद्रकांत माणिकराव सोनटक्के व जनमाहिती अधिकारी तथा सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, श्री. विरसिंह ठाकूर हे या पदावर कार्यरत आहेत. अपिलाची दखल त्वरित घेणे आवश्यक होते, हे प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. चंद्रकांत माणिकराव सोनटक्के यांनी सुनावणीच्या प्रारंभीच मान्य केले. नमूद केलेले शुल्क महाराष्ट्र मोटर वाहन नियम १९८९ मधील तरतुदींनुसार असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. नोंदणीकृत कोणत्याही वाहनाची माहिती मागितल्यास १० अगर त्याहून कमी वाहनांच्या माहितीसाठी २०/- रुपये शुल्क आकारावे असे या नियमावलीच्या कलम ५६ मध्ये म्हटले आहे, त्यानुसार तत्कालीन अधिका-यांनी शुल्क कळविले आहे. मात्र सार्वजनिक हिताचे वाटल्यास सरकार असे शुल्क कमी अथवा पूर्ण माफ करु शकते, असेही या नियमात म्हटले आहे. श्री. भालेराव यांनी मागितलेली माहिती सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वाची असल्याचे श्री.सोनटक्के यांनी मान्य केले व त्यानुसार दोन्ही मुद्यांबाबतची माहिती एका फ्लॉपीत केवळ ५०/- रुपये शुल्क आकारुन देण्याची तयारी दर्शविली. एवढेच नव्हे, तर संबंधित माहितीची फ्लॉपी सुनावणीच्या वेळी त्यांनी सादर केली. नियमाचा आधार घेताना केवळ तांत्रिकतेवर भर न देता माहितीच्या मागणीतील आशय लक्षात

घेऊन सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारण्याची श्री. सोनटक्के यांची भूमिका प्रशंसनीय आहे, त्याची विशेष नोंद घेण्यात येत आहे.

बेकायदेशीरपणे चालविल्या जाणां-या ऑटो रिक्षाबाबत जनजागृत्ती होणे गरजेचे आहे, तसेच पोलिस व प्रादेशिक परिवहन विभागाने त्याविरुध्द मोहीम उघडून विना परवाना व बेकायदेशीर ऑटो रिक्षा व्यवसायाला आळा घातला पाहिजे, अशी मागणी श्री. भालेराव व त्यांच्या सोबत सुनावणीला उपस्थित असलेले ऑटो रिक्षा संघटनेचे सदस्य यांनी केली. श्री. सोनटक्के यांनी त्याबाबत अनुकूलता दर्शविली.

वरील बाबींचा विचार करुन राज्य माहिती आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील मान्य

२. अपीलकर्त्याला आवश्यक असलेली माहिती ५०/- रुपये शुल्क घेऊन त्वरित (सुनावणीच्या तारखेपासून तीन दिवसात ) द्यावी. या आदेशाची पूर्तता जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांच्यामार्फत करुन घेण्याची जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे श्री. सोनटक्के यांची राहील.

पुणे
दिं :- १९/६/२००७

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

डॉ. संदीप विठ्ठल रोहकले,
द्वारा श्री. सोमनाथ खोले, शेटे बंगला,
(पार्वती कुंज), भालेराव कॉलनी,
मु.पो.तळेगांव दाभाडे ( स्टेशन),
ता.मावळ, जि. पुणे

अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे
श्री. प्रकाश मेघ:शाम परब

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक ),
जिल्हा परिषद, पुणे
श्री. एस.एम.चव्हाण

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४० / पुणे + २७२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५ /५/२००७ |

| | | |
|---|---|---|
| ३ | उपस्थित | **अपीलकर्ता**<br>डॉ. संदीप विठ्ठल रोहकले,<br>द्वारा श्री. सोमनाथ खोले, शेटे बंगला, (पार्वती कुंज), भालेराव कॉलनी,<br>मु.पो.तळेगांव दाभाडे ( स्टेशन),<br>ता.मावळ, जि. पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, पुणे<br>श्री. प्रकाश मेघ:शाम परब<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा<br>उपशिक्षणाधिकारी,(माध्यमिक ),<br>जिल्हा परिषद, पुणे<br>श्री. एस.एम.चव्हाण |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | अपील क्र. २४०/पुणे दि. २६.२.२००७<br>अपील क्र. २७२/ पुणे दि. १७.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | अपील क्र. २४०/पुणे दि. १४.३.२००७<br>अपील क्र. २७२/पुणे दि. १९.१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | अपील क्र. २४०/पुणे दि. २८.३.२००७<br>अपील क्र. २७२/पुणे दि. २८.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | अपील क्र. २४०/पुणे दि. -<br>अपील क्र. २७२/पुणे दि. २८.३.२००७ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | २४० / पुणे<br>१. शैक्षणिक वर्ष २००३-२००४ मध्ये दि.२४.१.२००४ रोजी कन्या शाळा हुजूरपागा, पुणे येथे झालेल्या शिक्षक-शिक्षकेतर मान्यता शिबिरासाठी नियुक्त शिक्षणा-धिकारी व इतर कार्यालयीन कर्मचारी यांची नावे समाविष्ट असलेले दस्तऐवज<br>२. सुभाष विद्या मंदीर, पिंपळवंडी येथील शिक्षण सेवक श्री.सोपान किसन वायाळ |

| | | |
|---|---|---|
| | | यांच्याबाबतच्या तक्रारी संदर्भातील चौकशी पथकातील अधिकारी व अहवाल आणि निष्कर्ष देणारे अधिकारी यांची नावे व हुद्दा<br>२७२ / पुणे<br>१. श्री.सोपान किसन वायाळ यांच्या मान्यतेचा प्रस्ताव ( शिक्षण खात्याच्या टिप्पणीसह ) व रुजू रिपोर्टच्या साक्षांकित प्रती<br>२. शिक्षण खात्याने दिलेल्या मान्यता पत्राच्या साक्षांकित प्रती |

## विवेचन

श्री. विठ्ठल काशीनाथ रोहकले हे सुभाष विद्या मंदिर, पिंपळवंडी, ता. जुन्नर, जि. पुणे येथील शाळेत मुख्याध्यापक होते. 'सुभाष विद्या मंडळ' या संस्थेची ही शाळा आहे. या संस्थेतील शिक्षण सेवक श्री.सोपान किसन वायाळ यांची नियुक्ती व त्यांना दिले गेलेले वेतन या संदर्भातील चौकशी व त्या अनुषंगाने पोलिसांकडे दाखल झालेला गुन्हा हा श्री. विठ्ठल काशीनाथ रोहकले यांचे चिरंजीव डॉ. संदीप विठ्ठल रोहकले यांनी केलेल्या दोन अपिलांचा मुख्य विषय आहे. आपल्या वडिलांना गुन्हयात अकारण व सूडबुध्दीने गोवण्यात आले असून त्यामुळे त्यांच्यासह आपल्या कुटुंबियांच्या जीविताला धोका आहे, असा दावा डॉ. संदीप रोहकले अर्ज, अपिले व या संबंधातील पत्रव्यवहार यांत सातत्याने करीत आले आहेत. त्यास अनुसरुन ४८ तासात माहिती देण्याची केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम कलम ७ (१) ची तरतूद लागू व्हावी, असेही त्यांचे म्हणणे आहे.

या विषयाची पार्श्वभूमी थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे :

'प्रत्यक्ष सेवेत नसताना (बनावट दस्तऐवज करुन) शासनाच्या अनुदानातून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा पगार काढणारे संस्थाचालक व मुख्याध्यापक यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत', या व अशा स्वरुपाच्या अन्य मागण्यांचे निवेदन दि.२०.६.२००६ रोजी पुणे जिल्हा मागासवर्गीय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना, पुणे यांचे वतीने संघटनेचे प्रमुख प्रा. संपत त्रिभुवन

यांनी अ) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे ब) शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे व  क) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर केले.

शिक्षण सचिव, शालेय शिक्षण विभाग; महाराष्ट्र राज्य, शिक्षण संचालक; महाराष्ट्र राज्य; पुणे यांनी या तक्रारीबाबत त्वरित दखल घेऊन एकूण एकवीस प्रकरणांची चौकशी करण्याचे आदेश दिले. या प्रकरणात दोषी आढळणा-यांविरुध्द दि. ६.९.२००६ रोजी फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे स्पष्ट निर्देश तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे श्री. टी. एन. सुपे यांना शिक्षण संचालक श्री. दि. रा. गोगटे यांनी दिले होते. परंतु श्री. सुपे यांनी विनाविलंब कार्यवाही केली नाही. याबाबत त्यांना समज देणारे पत्र शिक्षण संचालक श्री. गोगटे यांनी दि. ८.९.२००६ रोजी पाठविले. तसेच 'या अधिका-यांनी आपल्या कर्तव्याचे पालन न केल्यामुळे चौकशी अहवाल प्राप्त झाला नाही, ही गंभीर बाब आहे,' असे शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांना शिक्षण संचालक श्री. गोगटे यांनी दि. ५.१०.२००६ रोजी पत्रान्वये कळविले. 'याबाबतच्या चौकशी पथकात श्री. ए.बी.भोसले, श्री. बी.एस.आवारी व श्री. अे.डी.गुंजाळ हे उप शिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी श्री. सुपे यांना वगळून चौकशी पथक तयार करावे, अशा सूचना दिलेल्या असतानाही चौकशी पथकात त्यांचा समावेश केला आहे. त्यांना चौकशीमधून बाजूला ठेवणे योग्य होईल,' असे श्री. गोगटे यांनी शिक्षण उपसंचालकांना लिहिलेल्या या पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे. (तरीही चौकशी श्री. ए.बी. भोसले यांच्या प्रमुखत्वाखालील पथकानेच केली. )

(श्री. टी. एन. सुपे, श्री. बी.एस.आवारी, श्री. भोसले, श्री. अे. डी. गुंजाळ यांची खातेनिहाय चौकशी करुन तात्काळ प्रशासकीय कारवाई करावी, तसेच श्री. सुपे यांच्या कार्यकाळातील निर्णयांची फेरपडताळणी घेऊन चुकीचे व बेकायदेशीर निर्णय रद्द करण्याचे आदेश तात्काळ द्यावेत, अशी मागणी पुणे जिल्हा मागासवर्गीय शिक्षक - शिक्षकेतर संघटनेच्या पत्रात समाविष्ट आहे. )

चौकशी करावयाच्या प्रकरणांमध्ये 'सुभाष विद्या मंदिरा'तील श्री. सोपान किसन वायाळ यांच्या नियुक्तीबाबत व त्यांना दिल्या गेलेल्या वेतनाबाबत चौकशी करण्याचा समावेश होता. श्री. वायाळ सन २००३-२००४ मध्ये प्रत्यक्ष कामावर नसताना हजर असल्याचे दाखवून व तशी कागदपत्रे सादर करुन

नेमणुकीला मान्यता घेऊन वेतन घेतले आहे. यात शासनाची फसवणूक केली व अपहार केला, अशी तक्रार होती.

श्री. वायाळ यांना अप्रशिक्षित शिक्षणसेवक म्हणून अनुसूचित जमात संवर्गातून दि. १९.७.२००३ पासून तीन वर्षांसाठी दरमहा १५००/- रुपये मानधनावर नेमण्यात आले. हूजूरपागा प्रशाला, पुणे येथे दि. २४.१.२००४ रोजी झालेल्या शिक्षक - शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वैयक्तिक मान्यता शिबिरात त्यांच्या नियुक्तीस मान्यता देण्यात आली. ही मान्यता कोणत्या पत्राच्या आधारे देण्यात आली, हा या विषयातील मतभेदाचा महत्त्वाचा मुद्दा आहे.

'शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांनी दि.२४.१.२००४ च्या आदेशानुसार श्री. वायाळ यांच्या नियुक्तीला मंजुरी दिली. प्रशालेकडील मूळ हजेरी पत्रकात माध्यमिक शिक्षक संवर्गात तीस जणांच्या सहया आहेत. त्याखाली मुख्याध्यापकांची सही व शिक्का आहे. त्याच पृष्ठावर अ.क्र.३२ वर श्री. वायाळ यांचे नाव असून त्यावर दि. १९.७.२००३ पासून दि. ३१.७.२००७ पर्यंत त्यांच्या नियमित सहया आहेत. मात्र श्री. वायाळ यांच्या नोंदीखाली मुख्याध्यपकांची स्वाक्षरी आढळत नाही. त्यामुळे जुलै महिन्याच्या, तसेच नियमित उपस्थितीबाबत सांशकता वाटते. माहे ऑगस्ट २००३ व सप्टेंबर २००३ मधील त्यांच्या दैनंदिन सह्यांच्या खाली प्रभारी मुख्याध्यापक श्री. एम.डी. वामन यांनी साक्षांकन केले असून ते आक्षेपार्ह आहे. श्री. वायाळ यांना दिलेल्या दि. १९.७.२००३ ते ३०.९.२००३ या कालावधीचे, तसेच दि. १.३.२००४ रोजी हजेरी पत्रकावर स्वाक्षरी अथवा रजेची नोंद नसल्यामुळे त्या दिवसाचे असे एकूण रुपये ३६७७/- हे श्री. वायाळ यांच्याकडून वसूलपात्र ठरते,' असे दि. ३०.८.२००६ च्या लेखा परीक्षण अहवालात म्हटले आहे.

'संगनमताने वेतन अदा करुन शासकीय रकमेचा अपहार केला, या आरोपावरुन संस्थाचालक, मुख्याध्यापक व संबंधित शिक्षक यांच्या विरुध्द फौजदारी गुन्हा नोंदवावा,' असा शासनाचा निर्णय असल्यामुळे, त्यानुसार नारायणगाव पोलिस ठाण्यामध्ये उप शिक्षणाधिकारी श्री. अशोक बंडूजी भोसले यांनी दि. १४.९.२००६ रोजी फिर्याद नोंदविली. 'श्री. वायाळ यांनी प्रत्यक्ष काम न करता मुख्याध्यापक व शाळा समितीने तशी कागदपत्रे तयार करुन शिक्षण विभागाकडून त्यांच्या नियुक्तीस मान्यता घेतली व त्यांचे वेतन काढून शासनाची फसवणूक केली,' असे या फिर्यादीत नमूद केले आहे. श्री. सोपान किसन

वायाळ, (सेवानिवृत्त) मुख्याध्यापक श्री. विठ्ठल काशीनाथ रोहकले, शाळा समितीचे अध्यक्ष श्री. पांडुरंग कृष्णा घुले यांच्या विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करुन पुढील कारवाई करण्याची विनंती या फिर्यादीत केली आहे, त्यानुसार दि. १५.११.२००६ रोजी फौजदारी गुन्हा दाखल झाला आहे. मात्र चौकशी समितीसमोर आपल्याला बाजू मांडण्याची संधी मिळाली नाही व एकतर्फी चौकशी होऊन या प्रकरणात आपल्याला गोवण्यात आले, अशी तक्रार तत्कालीन मुख्याध्यापक श्री. विठ्ठल काशीनाथ रोहकले यांनी दि. २९.१.२००७ रोजी शिक्षण सहसंचालकांकडे केली आहे. (मुख्याध्यापक पदावरून ते दि. ३१.१०.२००३ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. )

या फिर्यादीत श्री. विठ्ठल काशीनाथ रोहकले यांचे नाव विनाकारण व सूडबुध्दीने गोवले आहे, असे डॉ. संदीप विठ्ठल रोहकले यांचे म्हणणे आहे. तसेच आपल्या वडिलांचे वय ६२ वर्षे असून त्यांना हृदयविकाराचा त्रास आहे, आई कर्करोगाने ग्रस्त आहे, फौजदारी गुन्हयात विनाकारण नाव नोंदविले गेल्यामुळे त्यांच्या मनावर ताण येत असून ते आरोग्याला घातक आहे, असे डॉ. संदीप रोहकले यांनी नमूद केले आहे. सुभाष विद्या मंदिराचे अध्यक्ष श्री. रमण दशरथ काकडे यांचे चिरंजीव व शाळा समितीचे सदस्य, संस्थेचे उपाध्यक्ष श्री. राजेंद्र रमण काकडे यांनी आपल्याला जीवे मारण्याची धमकी दिली. त्यांच्यापासून आपल्या जीविताला व मालमत्तेला धोका आहे, अशी तक्रार डॉ. रोहकले यांनी नारायणगाव पोलिस ठाण्यामध्ये दि. २५.२.२००७ रोजी केली आहे.

वरील संदर्भामुळे आपल्या वडिलांचे निर्दोषत्व सिध्द करण्यासाठी संबंधित माहिती तातडीने मिळणे आवश्यक होते, असे डॉ. रोहकले यांनी वरील दोनही अपिलात म्हटले आहे.

जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे श्री. एस.एम. चव्हाण यांनी अपील क्र. २४० मधील मूळ अर्जावर पुढीलप्रमाणे माहिती दिली :

मुद्दा क्र. १ - शिक्षक/शिक्षकेतर वैयक्तिक मान्यतेच्या शिबीरासाठी उप शिक्षणाधिकारी व संबंधित कर्मचारी यांना स्वतंत्र आदेश देण्यात आले नव्हते.

मुद्दा क्र.२ - चौकशी अधिकारी म्हणून उप शिक्षणाधिकारी श्री. अशोक बंडूजी भोसले यांची नियुक्ती करण्यात आली होती.

मुद्दा क्र. १ बाबतची माहिती तांत्रिकदृष्टया योग्य आहे. मात्र मुद्दा क्र.२ मधील फक्त चौकशी अधिका-याचे नाव वगळता इतरांची नावे वगैरे अन्य तपशील दिला गेला नाही.

अपुरी माहिती मिळाल्याच्या कारणावरुन डॉ. रोहकले यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे अपील केले. डॉ. रोहकले यांना या प्रकरणाची संपूर्ण नस्ती दाखवावी व त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण कागदपत्रे दि. १०.५.२००७ पूर्वी द्यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिका-यांनी दि. ४.५.२००७ रोजी दिला. परंतु आपल्याला आवश्यक असलेली माहिती मिळाली नाही, असे नमूद करुन श्री. रोहकले यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.५.२००७ रोजी अपील केले आहे.

अपील क्र. २७२ मधील मूळ अर्जातील 'ब-याच माहितीच्या साक्षांकित प्रती प्राप्त झाल्या. परंतु श्री. वायाळ यांच्या नेमणुकीचा प्रस्ताव अपूर्ण आहे,' असे पत्र डॉ. रोहकले यांनी शिक्षणाधिका-यांना दि. ८.१२.२००६ रोजी दिले. डॉ. रोहकले यांना द्यावयाच्या राहिलेल्या कागदपत्रांच्या प्रती दि. २०.१.२००७ रोजी द्याव्यात, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी दि. १८.१२.२००६ रोजी दिला. मात्र अन्य कागदपत्रांच्या प्रती देतानाच, 'नेमणुकीच्या प्रस्तावासोबत मागितलेली टिप्पणी कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध होत नाही' असे जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीनंतरही नमूद केले. श्री. वायाळ यांच्या रुजू रिपोर्टची प्रत मिळाली, पण त्यावर तत्कालीन मुख्याध्यापकांची (श्री. विठ्ठल काशीनाथ रोहकले) सही व शिक्का नाही, तर प्रभारी मुख्याध्यापकांचा सही-शिक्का आहे. त्यांच्या नियुक्तीच्या पत्रावर मात्र श्री. रोहकले यांची सही आहे. प्रभारी मुख्याध्यापकांनी केलेल्या साक्षांकनाबाबत लेखा परीक्षण अहवालातही आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. श्री. वायाळ यांचे रुजू दिनांकापासूनचे वेतन एप्रिल २००४ मध्ये पुरवणी वेतन देयकाद्वारे करण्यात आले आहे. त्याच्या सुमारे सहा महिने आधी दि. ३१.१०.२००३ रोजी श्री. विठ्ठल काशीनाथ रोहकले मुख्याध्यापक पदावरुन सेवानिवृत्त झाले होते.

सन २००३-०४ मधील नियुक्त्यांच्या मान्यतेबाबतचा प्रस्ताव (क्र.२१५) संस्थेकडून दि. २०.१.२००४ रोजी पाठविण्यात आला असून त्यात श्री. वायाळ यांच्यासह सहा शिक्षकांच्या नियुक्तीला मान्यता मागण्यात आली आहे. या पत्राबाबतची शासकीय टिप्पणी व त्यासोबतचे प्रास्ताविक पत्र दिले गेलेले नाही. हे पत्र कोणत्या मुख्याध्यापकांच्या सहीने पाठविले होते याला महत्व आहे, असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. शाळेकडील नोंद मात्र दि. ३०.७.२००३ रोजी प्रस्ताव पाठविल्याची आहे.

असा प्रस्ताव संबंधित मुख्याध्यापकाच्या सही-शिक्क्याने पाठविला जातो. श्री. विठ्ठल काशीनाथ रोहकले सेवानिवृत्त झाल्यानंतर तो पाठविला गेलेला दिसतो. म्हणून या पत्रावर कोणत्या मुख्याध्यापकाची सही आहे, तसेच कोणाच्या समंतीने व सहीने श्री. वायाळ यांचा पगार काढला गेला, हे महत्वाचे आहे. ही कागदपत्रे अपीलकर्त्याच्या दृष्टीने यामुळे महत्वाची आहेत.

दि. १९.१.२००७ रोजी शिक्षण विभागाकडून मिळालेली कागदपत्रे ही शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या अभिलेखातील नाहीत, तर सुभाष विद्या मंदिराकडून मागवून मिळवून दिलेली आहेत, हे उपस्थित अधिका-यांनी आयोगापुढील सुनावणीत मान्य केले. शाळेकडे व संस्थेकडे अर्जदाराने अनेक पत्रे पाठवूनही त्याला माहिती देण्यात आलेली नव्हती, आणि शिक्षण विभागही आपल्या कार्यालयीन अभिलेखातील म्हणून शाळेकडील माहिती देतो, हे आक्षेपार्ह आहे. तत्कालीन जन माहिती अधिका श्री. डी.पी. शेंडकर, श्री. बी.एस.आवारी, श्री. अशोक बंडूजी भोसले, श्री. ए.डी. गुंजाळ, सहायक माहिती अधिकारी श्रीमती गोरडे यांनी अशी माहिती दिल्याचे कागदपत्रांवरुन दिसते. मूळ दस्तऐवज शिक्षणाधिकारी कार्यालयात उपलब्ध नसताना शाळेकडून मागवून दिले हे आपल्यापासून लपवून ठेवले, व या कार्यालयाच्या अभिलेखातीलच असल्याचे सांगितले गेले, हा डॉ.रोहकले यांचा आरोप जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) श्री. एस.एम. चव्हाण व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) श्री. प्रकाश परब यांनी अमान्य केला. आपण डिसेंबर २००६ पासून हे काम पहात असल्याचे जन माहिती अधिकारी श्री. एस.एम. चव्हाण यांनी सांगितले. तसेच शिक्षणाधिकारी म्हणून आपण दि. २६.१०.२००६ पासून कार्यभार सांभाळत असल्याचे श्री. प्रका परब यांनी सांगितले. शाळेकडून मिळालेल्या कागदपत्रात अनेक नोंदी नंतर केलेल्या व बदललेल्या आहेत, जाणीवपूर्वक चुकीची / खोटी माहिती तयार करुन सादर करण्यात आली आहे, असा आक्षेप डॉ.रोहकले यांनी लेखी व तोंडी नोंदविला. कार्यालयाला शक्य ती माहिती दिली आहे, माहिती खोटी असल्याचे दर्शविणारे नेमके संदर्भ डॉ. रोहकले यांनी दिल्यास चौकशी करु, असे शिक्षणाधिकारी श्री. प्रकाश परब यांनी नमूद केले.

वरील सर्व विषय गुंतागुंतीचा आहे. सुभाष विद्या मंदिराचे संस्थाचालक व तत्कालीन मुख्याध्यापक श्री. विठ्ठल काशीनाथ रोहकले यांच्यामधील मतभेदातून त्रास दिला जात असल्याचे डॉ. रोहकले यांचे म्हणणे आहे. यां बाबतची वस्तुस्थिती हा स्वतंत्र विषय आहे. परंतु मागितलेली माहिती

खरी, नियमानुसार मुदतीत व पूर्ण दिली जाणे हा केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार बंधनकारक भाग आहे. शिक्षण विभागाच्या काही अधिका-यांनी हे काम संशयातीतपणे केलेले नाही, असे एकूण कागदपत्रे व सुनावणीतील निवेदने लक्षात घेता स्पष्ट होते.

मूळ संचिका शोधण्याचा आपण प्रयत्न केला. परंतु ती सापडली नाही, असे जन माहिती अधिकारी श्री. एस.एम. चव्हाण यांनी सांगितले. अपिलीय प्राधिकारी श्री. प्रकाश परब यांनी त्याला दुजोरा दिला. मात्र शिक्षणाधिकारी कार्यालयाकडील दस्तऐवज गहाळ होतात; हे समर्थनीय नाही. श्री. परब यांनी या विषयात अधिक सखोल लक्ष घालणे व आपण दिलेल्या आदेशांच्या अंमलबजावणीबाबत दक्ष रहाणे आवश्यक होते. दोषी व्यक्तींना पाठीशी घालण्यासाठी माहिती दडवून ठेवण्यात आली आहे, कदाचित ती नष्ट केली गेली असावी, असा अपीलकर्त्याचा आक्षेप आहे. या आक्षेपातील तथ्य चौकशीनंतरच स्पष्ट होईल. परंतु माहिती देण्याबाबतची व कागदपत्रांबाबतची एकूण परिस्थिती संशयाला वाव देणारी आहे. केवळ एखाद्या विषयापुरता नव्हे, तर एकूणच शैक्षणिक वातावरणातील निकोपतेच्या दृष्टीने हा सर्व प्रकार अत्यंत गंभीर आहे. म्हणून शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांच्या पातळीवरुन त्याची गंभीर दखल घेतली जाणे आवश्यक आहे.

जीवित व स्वातंत्र्य धोक्यात असण्याचा आणि त्यामुळे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ७(१) अन्वये अठ्ठेचाळीस तासात माहिती देणे आवश्यक असल्याचा अपीलकर्ता श्री. संदीप विठ्ठल रोहकले यांचा दावा ते सिध्द करु शकलेले नाहीत. तो अतिशयोक्त असल्याचे स्पष्ट होते. तसेच आपण म्हणतो तीच वस्तुस्थिती, आपण मांडलेला मुद्दाच खरा व ग्राहय, ते अमान्य करणे म्हणजे अन्याय्य / नियमबाहय, अशी त्यांची भूमिका आढळून आली. ती रास्त नाही.

वरील सर्व बाबी व संबंधित कागदपत्रे विचारात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य.

२. शिक्षण खात्याच्या टिप्पणीसह सर्व मूळ कागदपत्रांच्या आवश्यक त्या प्रती अपीलकर्त्याला दि. १५ जुलै २००७ पर्यंत द्याव्यात.

३. वरील क्र.२ प्रमाणे कागदपत्रांच्या प्रती देण्यासाठी मूळ संचिकेचा (फाईल) दि. १५.६.२००७ पर्यंत शोध घ्यावा, असा आदेश सुनावणीच्या दिवशी - दि. २५.५.२००७ रोजी आयोगाने दिला होता. असा शोध घेण्यास दि. १५.७.२००७ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. मात्र माहितीच्या या अपहाराबाबतची चौकशी करुन तोपर्यंत ही संचिका उपलब्ध न झाल्यास या कागदपत्रांची जबाबदारी असलेल्या संबंधित अधिका-यांविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदवावा. आयोगाला त्याची माहिती द्यावी.

४. चूकीची, अपुरी, विसंगत माहिती देणे, तसेच माहिती न देणे याद्वारे माहितीच्या अधिकाराचा भंग करणा-या संबंधितांना दंड होणे आवश्यक आहे. संबंधित सर्वांना मिळून रुपये १०,०००/- शास्ती लावण्यात येत आहे. संबंधितांची नावे निश्चित करुन ही शास्ती त्यांच्या माहे जुलै २००७ च्या वेतनातून समप्रमाणात कपात करुन '००७, इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१) ' या लेखाशिर्षाखाली जमा करावी. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे श्री. प्रकाश परब यांची ही जबाबदारी राहील. त्याबाबतचा पूर्तता अहवाल त्यांनी दि. ५.८.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा.

संबंधितांच्या गोपनीय अहवालात व सेवापुस्तकात या शास्तीची नोंद करावी.

५. शिक्षणाधिकारी कार्यालय व सुभाष विद्या मंडळ - सुभाष विद्या मंदिर यांच्याकडील संबंधित दस्तऐवजांची उपलब्धता, सत्यासत्यता व संबंधित कर्मचा-यांकडून होणारी त्यांची हाताळणी हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अपेक्षित असलेल्या पारदर्शकतेच्या दृष्टीने महत्वाचा भाग आहे. अशा पारदर्शकतेसाठी या अभिलेखांची व त्याबाबतच्या व्यवस्थेची शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक ), महाराष्ट्र शासन, पुणे यांनी स्वतंत्रपणे चौकशी करावी. दि. १५.९.२००७ पर्यंत त्यांनी चौकशी पूर्ण करुन पूर्तता अहवाल आयोगाला पाठवावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**पुणे**
**दिनांक :- /६/२००७**